
ePaper

## दाभोलकर हत्या प्रकरण : तपासावरील देखरेखीबाबतचा निर्णय राखीव



| वर्ष - 6 | अंक - 343 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार दि. 2 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- कांदा उत्पादकांना दिलासा!
- 'परमोच्च त्याग, समर्पण भावनेचे प्रतिक म्हणजे भगवा रंग!
- वीज दरवाढ बेकायदेशीर




# पिंपरी-चिंचवडकरांचे प्रेम अविस्मरणीय!

## प्रसिद्ध अभिनेता श्रेयस तळपदे : 'फेस ऑफ इन्स्पिरेशन' पुरस्कारांचे वितरण

।पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांनी माझ्या कलाक्षेत्रातील सुरूवातीपासून अमूल्य प्रेम दिले. नाटकामध्ये काम करीत असताना मी प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात पहिल्यांदा आलो होतो. त्यावेळीपासून या शहरातील नागरिकांनी माझ्या पाठीवर कौतुकाची थाप दिली आहे. 'फेस ऑफ इन्स्पिरेशन' पुरस्काराच्या माध्यमातून समाजातील विविध क्षेत्रात लक्षवेधी काम करणाऱ्या व्यक्तीमत्वांचा गौरव करण्यात येतो आहे. ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे, अशा भावना प्रसिद्ध सिने अभिनेता श्रेयस तळपदे यांनी व्यक्त केल्या.**



चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे "एक्सप्रेस मीडिया इंटरप्राईजेस, पुणे" यांच्या यांच्या वतीने "फेस ऑफ इन्स्पिरेशन" पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या दिमाात संपन्न झाला. यावेळी पद्मश्री गिरीष प्रभूणे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार अण्णा बनसोडे, उमा खापरे, शिवसेना गटनेत्या सुलभा उबाळे, भाजपाच्या नेत्या शैला मोळक, "एक्सप्रेस मीडिया इंटरप्राईजेसचे संस्थापक अधिकराव दिवे-पाटील, मुख्य संचालिका मनीषा थोरात-पिसाळ यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आली तसेच प्रमुख पाहुणे यांचा सत्कार करण्यात आला. विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमामध्ये धृव ॲकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी गणेश वंदन आणि स्वागतपर नृत्य सादर केले. प्रसिद्ध गायक आर. के. राहुल यांनी बहारदार गायन करुन श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. मुख्य संचालिका मनीषा थोरात-पिसाळ यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन आर. जे. अक्षय आणि शुभांगी शिंदे यांनी केले.

### पुरस्कारार्थींचे शहराच्या विकासात योगदान

**»खासदार श्रीरंग बारणे म्हणाले की, सामाजिक क्षेत्रात आणि प्रसारमाध्यम क्षेत्रात काम करीत असताना संस्थेने विविध क्षेत्रात काम करणाऱ्या नवोदित पण लक्षवेधी व्यक्तीमत्वांचा गौरव केला. त्यांना पुरस्कार दिला आहे. मात्र, पुरस्कारामुळे आपली जबाबदारी वाढली आहे, ही बाब लक्षात घेतली पाहिजे. पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासात पुरस्कार मिळालेल्या सर्व मान्यवरांचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष योगदान राहिले आहे, असेही बारणे यांनी अधोरेखित केले.**





"पिंपरी-चिंचवड शहराची स्थापना होवून केवळ ५० वर्षे झाली आहेत. एखादे शहर विकसित होण्यासाठी दीडशे ते दोनशे वर्षांचा काळ लोटतो. पुण्याची ख्याती जगभरात होण्यासाठी महात्मा फुले, लोकमान्य टिळक, आगरकर आदींसारखे महान व्यक्तीमत्व जन्मावी लागली. आज ज्या मान्यवरांना पुरस्कार मिळाला आहे. ते भविष्यकाळात पिंपरी-चिंचवडचे फुले, टिळक, आगरकर म्हणून ओळखले जातील. माझ्या ४० वर्षांच्या समाजसेवेत पहिली ३० वर्षे एकही पुरस्कार मिळाला नाही. पण, गेल्या १० वर्षांत पुरस्काराचा अक्षरश: पाऊस पडला आहे. शहराच्या विकासात प्रत्येकाने योगदान दिले पाहिजे.

- डॉ. गिरीष प्रभुणे, पद्मश्री.

पुरस्कारार्थींची नावे पान 2 वर

## पान 1 वरून



### पुरस्कारार्थींची नावे पुढीलप्रमाणे :

१- अक्षय पंजाबी, उद्योजक.
२- कुंदाताई भिसे, समाजसेविका.
३- राजेंद्र निकाळजे, वरिष्ट पोलीस निरीक्षक.
४- प्रवीण भालेकर, कार्यक्षम नगरसेवक.
५- राजन लाखे, ज्येष्ठ साहित्यिक.
६- राजेंद्र डुंबरे, आदर्श कार्य.
७- गुरूलिंग देशमुख-आशालता देशमुख, आदर्श माता-पिता.
८- वंदना चव्हाण, विद्युत रोषणाई सल्लागार.
९- मंगेश हिंगणे-सरकार, सामाजिक.
१०- विश्वजित बारणे, युवा नेता.
११- डॉ. वैशाली घोडेकर, वैद्यकीय.
१२- जयदेव अक्कलकोटे, उद्योजक.
१३- सरिता साने, महिला सक्षमीकरण.
१४- कविता भोंगाळे, महिला सक्षमीकरण.
१५- जालिंदर फेंगसे, क्रीडा क्षेत्र.
१६- बाळासाहेब विनोदे, सहकार क्षेत्र.
१७- भूषण मावळे, गुरूवर्य अॅकॅडमी स्कूल, शिक्षण रत्न.
१८- आशादेवी दुरगुडे, आधुनिक नवदुर्गा.
१९ - अरुण पवार, पर्यावरण.
२०- अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरूपीठ आणि श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक सेवा मार्ग, दिंडोरी प्रणित याचे पीठाधीश गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे, अध्यात्म.
२१- ए.के. क्रिकेट क्लब, क्रीडा क्षेत्र.
२२- ध्रुव अॅकॅडमी, कला क्षेत्र.
२३- केंब्रिज इंटरनॅशनल स्कूल, शिक्षण क्षेत्र.
२४. डॉ. मयूर काठोळे, उद्योजक
२५. राहुल पाखरे, उद्योजक

# कांदा उत्पादकांना दिलासा!

## प्रतिक्विंटलला मिळणार इतकं अनुदान; अर्ज करण्याचे आवाहन

**। पुणे। महाईन्यूज ।**
**प्रतिनिधी।**

**फेब्रुवारी महिन्यात राज्यात झालेली कांद्याच्या दरातील घसरण आणि शेतकरी संघटनांकडून होणारी मागणी लक्षात घेऊन राज्य सरकारने कांदा उत्पादकांना प्रतिक्विंटल ३५० रुपये अनुदान जाहीर केले आहे. त्यामुळे उत्पादकांना दिलासा मिळणार आहे.**

याचा लाभ एक फेब्रुवारी ते ३१ मार्चदरम्यान बाजार समिती, खासगी बाजार; तसेच नाफेडकडे विक्री करणाऱ्या उत्पादकांना मिळणार आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना येत्या तीन ते २० एप्रिलदरम्यान अर्ज करण्याचे आवाहन पणन संचालक विनायक कोकरे यांनी केले. राज्यात गेल्या वर्षी उशिरापर्यंत झालेल्या पावसामुळे कांद्याचे पीक बहुतांशी वाया गेले होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी कांद्याची लागवड उशिरा केली होती. ते पीक डिसेंबरअखेरीस येणे अपेक्षित होते. मात्र, जानेवारीनंतर बाजारात कांद्याची मोठी आवक झाली.

त्यामुळे फेब्रुवारीमध्ये कांद्याच्या दरात प्रतिक्विंटल घसरण होत असल्याचे बाजार समित्यांमध्ये पाहायला मिळाले.

कांद्याचे दर घसरल्याने शेतकरी; तसेच शेतकरी संघटनांकडून कांद्याला अनुदान देण्याची मागणी होऊ लागली. त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने माजी पणन संचालक डॉ. सुनील पवार यांच्या अध्यक्षतेखाली कांदा उत्पादकांना अनुदान देण्याबाबत शिफारस करण्यासाठी समिती स्थापन केली होती. त्या समितीने राज्यातील बाजार समित्यांना प्रत्यक्ष भेटी देऊन तेथील शेतकरी, आडते, व्यापारी; तसेच तज्ज्ञांशी चर्चा केली होती. त्यानंतर तयार केलेला अहवाल राज्य सरकारला सुपूर्द केला होता. त्या अहवालात डॉ. पवार यांनी अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजनांच्या शिफारशी केल्या आहेत. त्या शिफारशी सरकारकडे विचाराधीन होत्या.

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्या, खासगी बाजार समित्या, थेट पणन परवानाधारक; तसेच नाफेडकडे एक फेब्रुवारी ते ३१ मार्च या कालावधी लेट खरीप हंगामातील लाल कांदा विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल ३५० रुपये आणि जास्तीत जास्त दोनशे क्विंटल प्रति शेतकरी याप्रमाणे अनुदान मंजूर करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.




### योजनेतील अटी

- परराज्यातून आवक झालेल्या व व्यापाऱ्यांच्या कांद्यासाठी ही योजना लागू नाही.
- अनुदान थेट शेतकऱ्यांच्या बँकेत जमा होणार.
- अनुदान मिळवण्यासाठी कांदा विक्री पट्टी किंवा विक्री पावती, सातबारा उतारा, बँकेच्या खाते क्रमांकासह बाजार समितीकडे अर्ज करावा.
- शेतकऱ्यांना अनुदान देण्यासाठी बाजार समितीने प्रस्ताव तयार करावेत.
- तालुका सहायक निबंधकांनी प्रस्ताव तपासून जिल्हा निबंधकांकडे सादर करावा.
- योजनेच्या अंमलबजावणीसाठी बाजार समितीचे सचिव, जिल्हा उपनिबंधक लाभार्थी अंतिम करण्यासाठी नियंत्रक म्हणून काम पाहतील.
- पणन संचालकांनी जिल्हानिहाय लाभार्थ्यांची यादी तयार करून ३० दिवसांत पाठवावी.

# मावळ तालुका हादरला!

## शिरगावच्या सरपंचाचा भर चौकात खून, पाठलाग करून केले कोयत्याने वार

**। मावळ। महाईन्यूज ।**
**प्रतिनिधी।**



: मावळ तालुक्यातील शिरगाव ग्रामपंचायतीचे सरपंच. प्रवीण साहेबराव गोपाळे यांचा अज्ञात हल्लेखोरानी भर चौकात निर्घृण खून केल्याची घटना समोर आली आहे. आज शनिवारी रात्री नऊच्या सुमारास ही घटना घडली आहे. या घटनेने मावळ तालुका हादरला आहे. जमिनीच्या वादातून हा प्रकार झाल्याची माहिती समोर येत आहे. प्रवीण साहेबराव गोपाळे (वय ४७), असे खून झालेल्या सरपंचाचे नाव आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, प्रवीण गोपाळे हे शिरगावचे विद्यमान सरपंच म्हणून काही दिवसांपूर्वीच निवडून आले होते. चांगल्या मतधिक्याने ते विजयी झाले होते. प्रवीण गोपाळे हे शनिवारी रात्रीच्या सुमारास आपल्या दुचाकीवरून शिरगाव चौकात कामानिमित्त आले होते. मात्र अचानक त्यांच्यावर काही हल्लेखोरांनी हल्ला केला.

अचानक हल्ला झाल्याने त्यांनी पळापळ सुरू केली. मात्र हल्लेखोरांनी पाठलाग करून त्यांच्यावर कोयत्याने वार केले. त्यातच त्यांचा मृत्यू झाला, अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली आहे.


# सारसबाग प्लाझाला ‘एस्टिमेट’ची मान्यता

## पावणेनऊ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित

**। पुणे। महाईन्यूज ।**
**प्रतिनिधी।**

**सारसबाग चौपाटीची पुनर्रचना करून तेथे फूड आणि वॉकिंग प्लाझा विकसित करण्याच्या प्रस्तावाला पालिकेच्या पूर्वगणन समितीने (एस्टिमेट) मान्यता दिली आहे. भवन विभागाच्या माध्यमातून हा प्लाझा उभारण्यात येणार असून, त्यासाठी आठ कोटी ७३ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. नुकत्याच सादर अर्थसंकल्पात त्यासाठी साडेसात कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.**

महापालिकेने या परिसरात ५३ जणांना व्यवसाय परवाने दिले आहेत. मात्र, व्यावसायिकांनी स्टॉलला हॉटेलचे स्वरूप दिले असून अनेकांचे कामगारही तेथेच राहतात. त्यामुळे नियमभंग होत असल्याने महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने १४ मे २०२२ रोजी येथील ५३ स्टॉल सील केले होते. यानंतर पथारी व्यावसायिक संघटनांनी यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी आयुक्तांकडे केली होती. यावर आयुक्तांनी अधिकाऱ्यांची बैठक घेऊन सारसबाग चौपाटी येथे अतिक्रमण होऊ नये, यासाठी तसेच येथे भेट देणाऱ्या पर्यटकांची सोय व्हावी, यासाठी वॉकिंग प्लाझा करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार, सर्व स्टॉलधारकांना एकसारखे स्टॉल दिले जाणार आहेत. स्टॉलची रचना आकर्षक असेल. प्रत्येक स्टॉलपुढे मर्यादित टेबल-खुर्च्यांची सुविधा असणार आहे.



### जबाबदारी भवन विभागाकडे

सारसबागेच्या बाहेरील स्टॉलचे नियमन अतिक्रमण विभागातर्फेच केले जात होते. त्यामुळे येथे प्रस्तावित फूड व वॉकिंग प्लाझाचे कामही अतिक्रमण विभागातर्फेच केले जाणार होते. त्याचा आराखडा तयार करणे ते एस्टिमेट मान्य करून घेण्याची व अन्य मान्यतांची कामेही अतिक्रमण विभागानेच केली आहेत. त्यासाठी अतिक्रमण विभागासाठी शुक्रवारी संपलेल्या आर्थिक वर्षात दोन कोटी रुपयांची तरतूदही करण्यात आली होती. मात्र, आज, शनिवारपासून सुरू होणाऱ्या नव्या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात सारसबाग फूड व वॉकिंग प्लाझासाठी भवन विभागाच्या माध्यमातून साडेसात कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.



# परमोच्च त्याग, समर्पण भावनेचे प्रतिक म्हणजे भगवा रंग !

## हिंदुत्ववादी विचारवंत शरद पोंक्षे यांचे मत; मोशी येथे श्रीराम जन्मोत्सव दिमाखात साजरा

।पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

आदर्श कसा असावा? तो म्हणजे प्रभू श्रीराम आहेत. राजकारण धुरंधर कृती म्हणजे श्रीकृष्ण आहेत. अवतारी पुरुषांनी हातात भगवा घेतला होता. सर्वोदय आणि सूर्यास्ताला अवकाश भगवेमय होते. हातात भगवा घेण्यासाठी स्वतःची आहुती देण्याची तयारी असावी लागते. त्याच्याच डोक्यावर भगवी टोपी, फेटा शोभून दिसतो. परमोच्च त्याग, समर्पण भावना म्हणजे भगवा रंग आहे. कधी राम व्हायचे? आणि कधी कृष्ण व्हायचे? हे जाणले ते छत्रपती शिवाजी महाराज होते. ज्यांना जी भाषा समजते. त्याच भाषेत समजवले पाहिजे. या विचारांतूनच छत्रपतींनी स्वराज्य घडवले, असे मत हिंदुत्ववादी विचारवंत शरद पोंक्षे यांनी व्यक्त केले.

यावेळी अध्यात्मिक गुरू स्वामी स्वरुपानंद महाराज, प्रखर हिंदुत्ववादी विचारवंत शरद पोंक्षे, हिंदू राष्ट्र सेनेचे संस्थापक धनंजय देसाई, माजी महापौर राहुल जाधव, निलेश बोराटे, निखिल बोऱ्हाडे, संतोष बारणे, नितीन बोराटे, सचिन तापकीर यांच्यासह ग्रामस्थ, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शरद पोंक्षे म्हणाले की, केवळ श्रीराम नवमीला रामाचा आठवण काढायची आणि इतर दिवशी विसरायचे, ही आपली संस्कृती आहे. 'डे' म्हणजे फादर डे, मदर डे साजरा करण्याची संस्कृती परकीयांची आहे. आपला प्रत्येक दिवस श्रीरामामुळे आणि छत्रपती शिवाजी महाराजांमुळे मिळालेला आहे.

आपण हिंदू म्हणून जगतो आहोत. ताट मानेने उभे आहोत. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यामुळेच हे सौभाग्य मिळाले आहे. राजमाता जिजाऊंनी केवळ श्रीराम आणि श्रीकृष्ण यांचे संस्कार छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर केले.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, राज्यातील अनेक नेत्यांनी काही वर्षांपूर्वी क्रांतिवीर सावरकर यांच्या जाज्वल्य इतिहासाबाबत तोंड भरुन स्तुती केली. तेच राजकीय मंडळी आज सावरकरांच्या विचारांना विरोध करीत आहेत. राजकीय लोकांनी सोयीनुसार समाज वाटून घेतले आहेत. सोईनुसार देव आणि अस्मिता वाटून घेतल्या आहेत. त्यामुळे राजकीय लोकांनी व्यासपीठावर बोलताना इतिहासाचे दाखले देवू नयेत, अशी माझी भूमिका आहे. प्रत्येक कुटुंबासाठी प्रभू श्रीराम आदर्श आहेत. प्रेरणास्थान आहेत.







### पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात हिंदू राष्ट्र होईल...

» यावेळी पोंक्षे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतापगडावरील अफझल खान भेटीचा प्रसंग सांगीतला. तसेच "अहिंसा परमो धर्मः धर्म हिंसा तथैव च"याचाही अर्थ समाजवून सांगितला. अफझल खान भेटीत छत्रपतींनी अहिंसा किंवा गांधीवादी भूमिका घेतली असती, तर काय झाले असते? असा उपरोधिक सवालही त्यांनी उपस्थित केला. निधर्मी राष्ट्राच्या (सेक्युलर) संकल्पनेवरही त्यांनी सडकून टीका केली. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली हिंदू राष्ट्र घोषीत होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### निलेश बोराटे यांच्या कार्याला कौतुकाची थाप...

» समाजाचे प्रबोधन करण्यासाठी निलेश बोराटे यांनी प्रभू श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यासाठी पुढाकार घेतला. या माध्यमातून केवळ लोकांची मते मिळवण्यासाठी किंवा नगरसेवक होण्यासाठी आपण कार्यक्रम घेत नाही, तर लोकांना आणि समाजाला दिशा देण्यासाठी कार्यक्रम घेतो... असा संदेश निलेश बोराटे यांनी या कार्यक्रमाच्या निमित्ताने दिला आहे. बोराटे कुटुंबीयांचे सामाजिक क्षेत्रात मोठे योगदान आहे, अशा शब्दांत आमदार महेश लांडगे यांनी युवा नेते निलेश बोराटे यांचे कौतूक केले.

## संपादकीय »

# महामार्गाचे महाधिंडवडे!


***क्रमांक ६६ या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू होऊन एक तप उलटून गेले आहे. जणू काही देशांना जोडणारा हा आंतरराष्ट्रीय मार्ग असावा अशा थाटात त्याचे काम सुरू आहे. गाजावाजा करत या महामार्गाच्या कामाला सुरुवात झाली.***

जमीन संपादन आणि इतर तांत्रिक बाबी पूर्ण झाल्या की जवळपास साडेपाचशे किलोमीटरचा पळस्पे ते बांदा इथपर्यंतचा हा मार्ग चार ते पाच वर्षांत पूर्ण होईल आणि एरव्ही रडत-खडत होणारी वाहतूक सुसाट होईल अशी अटकळ बांधली गेली होती. प्रत्यक्षात बारा वर्षे उलटून गेली तरी हा मार्ग पूर्ण होण्याचे नाव घेत नसून खऱ्या अर्थाने हा मार्ग पूर्ण होण्यास अजून दोन ते तीन वर्षे लागतील असे बोलले जात आहे. कारण काही ठिकाणी जमिनीचा वाद सुरू आहे. पनवेलच्या पळस्पे येथून सुरू होणारा हा मार्ग वाहतुकीच्या दृष्टीने खूपच महत्त्वाचा आहे.

हा मार्ग केवळ गोवा राज्यापर्यंत नाही तर पुढे कर्नाटक, केरळातून तामिळनाडूत पोहचतो. मालवाहतूक आणि प्रवासी वाहतूक या मार्गावरून नेहमीच मोठ्या प्रमाणात होत आली आहे. कोकणात वाढलेले औद्योगिक क्षेत्र आणि विविध आकर्षक पर्यटन स्थळे यामुळे छोट्या-मोठ्या वाहनांची वर्दळ दुतर्फा अव्याहतपणे होत आहे. गणेशोत्सव, होळी आणि नाताळमध्ये प्रवासी वाहनांची संख्या वाढते. हा मार्ग पूर्वी तासंतास वाहतूक ठप्प करून ठेवत असे. म्हणून चौपदरीकरणाचा प्रस्ताव पुढे आला आणि काम सुरू झाले. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या देखरेखीखाली याचे काम सुरू झाले. केंद्रात रस्ते वाहतूक खाते नितीन गडकरी यांच्याकडे असल्याने आणि त्यांच्या कामाचा उरक पाहता मुंबई-गोवा महामार्ग लवकर पूर्ण होण्यास काहीच अडचण असणार नसल्याचे म्हटले गेले, पण कूर्मगतीने सुरू असलेले काम पूर्ण होण्याचे नाव घेत नाही.सध्या या महामार्गाचे भिजत घोंगडं पडणं ना शासनाला शोभा देणारे, ना लोकप्रतिनिधींना शोभा देणारे आहे. मार्गाच्या रखडलेल्या कामाची खरं तर गिनिज बुकात नोंद झाली पाहिजे.

देशात अनेक ठिकाणी राष्ट्रीय महामार्गांची कामे भन्नाट वाटावी अशा वेगाने पूर्ण झाली. काही मार्गांवर लढाऊ विमाने, हेलिकॉप्टर उतरविण्याचे प्रात्यक्षिकही झाले. मुंबई ते गोवा मार्गावर अशी अनेक ठिकाणे आहेत की तेथून प्रवास नकोसा वाटतो. तळकोकणात खासगी वाहने कोल्हापूर मार्गावरून नेणे पसंत केले जात आहे. मध्यंतरी अपूर्ण कामामुळे अपघातांचे प्रमाण वाढत असल्याकडेही लक्ष वेधले गेले. तरीही कामाचा वेग वाढलेला नाही. नोकर बदलावेत त्याप्रमाणे ठेकेदारही बदलून झाले. यातून काही निष्पन्न झालेले नाही. वेळ, इंधन याची नासाडी परवडणारी नसली तरी ती होतेय ही वस्तुस्थिती आहे.

# चांदा ते बांदा! कांद्याचा वांदा!






जगातील अनेक देशात कांदा लागवड केली जाते. जगात कांदा लागवडीखालील क्षेत्र ३००० हेक्टरपेक्षा जास्त आहे. चीन, भारत, तुर्कस्तान, अमेरिका, पाकिस्तान या देशांमध्ये कांदा उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. भारतातील कांदा उत्पादनाचा राज्यवार विचार करता महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक लागतो आणि महाराष्ट्रातील कांदा उत्पादनाचा जिल्हावार विचार करता नाशिक जिल्ह्याचा प्रथम क्रमांक लागतो. म्हणजेच नाशिक जिल्हा हा भारतातील कांदा उत्पादनासाठी महत्त्वाचा आहे. वर्षभरात विविध हंगामात हा कांदा बाजारपेठेत येतो, परंतु हाच कांदा आपल्या अतिजास्त तसेच अतिकमी बाजारभावामुळे प्रसिद्ध आहे. गेल्या काही दिवसांपासून कांद्याचे भाव मोठ्या प्रमाणावर कमी झालेले दिसतात.

कांद्याच्या पुरवठ्यात अचानक झालेल्या वाढीमुळे अनेकदा भाव गडगडण्याची इतिहासात अनेक उदाहरणे आहेत. भाव किमान पातळीवर येऊन शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चदेखील भरून निघत नसेल तर शेतकरी उत्पादित केलेला कांदा रस्त्याच्या कडेला, बाजारपेठेच्या बाजूला टाकून किंवा फेकून देतात. सध्या अनेक ठिकाणी अशी परिस्थिती दिसत आहे. यापूर्वी अशा घटना अनेक ठिकाणी झालेल्या आहेत. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला उन्हाळी कांदा हा साठवणुकीच्या पुरेशा व कार्यक्षम सोयीअभावी वाया जातो.

तसेच कांदा साठवणुकीत कांदा सडणे, कुजणे, वाया जाणे, कोंब येणे, वजन कमी होणे या प्रकारांमुळे कांदा वाया जातो. तसेच कांद्याचा बाजारपेठेतील पुरवठा कमी झाल्यामुळे अनेकदा कांद्याच्या किमती अवास्तव वाढतात. एकूणच कांद्याच्या किमती या अतिउच्च आणि अतिकिमान पातळीवर येऊन एका डोळ्यात हसू आणि एका डोळ्यात अश्रू आणत असतात. या अतिकमी आणि अतिजास्त किमतीवर कसे नियंत्रण ठेवता येईल हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

अतिकमी किमतीवरील नियंत्रण

हमी किंमत – कोणत्याही शेतमालाची किंमत वाजवीपेक्षा कमी होत असेल तर सरकारने त्यासाठी हमी किंमत देणे महत्त्वाचे आहे. कांद्याच्या कमी होणाऱ्या किमतीमुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी योग्य ती हमी किंमत शासनाने द्यावी. त्यात शेतकऱ्यांना आलेला उत्पादन खर्च वसूल व्हावा अशा प्रकारची हमी किंमत असावी.

निर्यात वृद्धी – कांद्याच्या किमती अवास्तव कमी झाल्यास चांगल्या प्रकारच्या कांद्याची निर्यात होणे आणि त्यात वाढ होणे आवश्यक आहे. कांदा निर्यातीत शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी कमी होऊन विनाविलंब कांदा निर्यात झाल्यास शेतकऱ्यांना चार पैसे मिळू शकतील यात शंका नाही. यासाठी शासनाची भूमिका महत्त्वाची ठरते.

कांदा साठवणूक – कांद्याचे अतिरिक्त उत्पादन होऊन भाव गडगडले तर एक उपाय म्हणून साठवणुकीकडे पाहिले जाते, पण पावसाळी कांदा साठवणुकीयोग्य नसतो, तर उन्हाळी कांद्याची साठवणूक होऊ शकते.

आपल्या शेतकऱ्यांकडे चांगल्या दर्जाच्या कांदा चाळी उपलब्ध नसतात. उच्च दर्जाच्या कांदा चाळी यासाठी आवश्यक आहेत. शासनाने शासकीय पातळीवर कांदा साठवणूक करण्याचा प्रयत्न केल्यास बऱ्याच अंशी बाजारातील कांद्याचा भाव आटोक्यात राहण्यास मदत होईल.

कांदा चाळ अनुदान – कांदा चाळ निर्मिती करणे सर्वसामान्य शेतकऱ्यांना आर्थिक दृष्टीने परवडणारे नाही. त्यामुळे मोठे पण संख्येने कमी असणारे शेतकरी कांदा चाळ निर्मिती करतात, परंतु सर्वसामान्य शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. या शेतकऱ्यांनी तयार केलेल्या घरगुती कांदा चाळीत कांदा सुरक्षित राहू शकत नाही. या शेतकऱ्यांनी कांदा साठवणूक करावी यासाठी प्रयत्न होणे महत्त्वाचे आहे. शासनाकडून कांदा चाळ अनुदान दिले जाते, परंतु त्यात वाढ होणे महत्त्वाचे आहे. कारण कांदा हा महाराष्ट्राच्या कृषी उत्पादनातील महत्त्वाचा घटक आहे.लागवडीचे नियोजन – शेतकऱ्यांकडून कांदा लागवडीचे नियोजन होणे महत्त्वाचे आहे.

# ध्येय आणि उद्दिष्ट!

**आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर ध्येये आणि उद्दिष्टे ठरविणे आणि ते साध्य करणे हे वैयक्तिक; तसेच व्यावसायिक प्रगतीकरिता अतिशय आवश्यक आहे.**



भविष्यात नक्की काय करायचे त्याला एक दिशा मिळते. ध्येयांना मूर्तस्वरूप देण्याचा मार्ग विकसित होऊ लागतो. आपली ध्येये आणि उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक ती सर्व तंत्रे, कौशल्ये आपण शिकू लागतो. प्रत्येक कामागिरी चोखपणे पार पाडण्याची प्रवृत्ती वाढीस लागते. प्रत्येक घटनेची जबाबदारी स्वतःवर घेत गेल्याने व्यक्तिमत्त्व दिवसेंदिवस सक्षम होत जाते.

आपण या पूर्वीच्या लेखांमध्ये आत्मपरीक्षण SWOT च्या माध्यमातून करायला शिकलो. याचा उपयोग आता GOAL SETTING मध्ये करायचा आहे. आपली बलस्थाने ओळखून STRENGTHS नुसार ध्येये ठरवता येतात, तर न्यूनतांचा विचार केल्यामुळे नवीन तंत्रे व कौशल्ये शिकण्यास सुरवात झालेली असेल. चला तर बघूया, ध्येये आणि उद्दिष्टे कशी लिहावीत!

1) ध्येये व उद्दिष्टांची निवड : स्वतःची आवड, आर्थिक कुवत; तसेच आत्तापर्यंत अवगत झालेले ज्ञान तथा एखाद्या क्षेत्रातील अनुभव लक्षात घेऊन ध्येये आणि उद्दिष्टांची निवड करता येईल. येथे स्वतःतील बलस्थानांचा आढावा घ्या.

2) पंचवार्षिक योजना : व्यवस्थापकीय दृष्टिकोनातून प्रत्येक ध्येय किमान पाच वर्षांकरिता लिहिले जाते. मला पाचव्या वर्षी काय साध्य करायचे याचा विचार उतरत्या क्रमाने केला जातो. उदाहरणार्थ, वर्ष २०23 ते २०२८ मध्ये मी पाचव्या वर्षी व्यवसाय सुरू करू इच्छितो. त्याकरिता येत्या पाच वर्षांचे नियोजन. २०२८ मध्ये व्यवसाय सुरू, तर २०२५ मध्ये माझे एमबीए पूर्ण होणे गरजेचे आहे. त्याकरिता २०23 मधे पूर्वपरीक्षा पास करणे. या पाच वर्षांत अनेक GOALS ना अल्पकालीन, मध्यमकालीन; तसेच दीर्घकालीनमध्ये विभागून त्यावर काम करावे लागेल.

3) SMART : आपल्या ध्येये आणि उद्दिष्टांना तोलूनमापून घेण्याची पद्धत. ध्येय अल्पकालीन असो, वा दीर्घकालिन त्याला SMARTच्या पट्टीवर पडताळून बघा. माझी नैसर्गिक क्षमता (APTITUDE) समजून घेणे. त्यातून आपल्या ध्येयाचे मोजमाप करणे म्हणजे सतत त्याचा आढावा घेणे. उदा. MBA प्रथम वर्ष सर्वांना सारखेच विषय असतात; पण SPECIALIZATION कडे वळताना जरी HR घ्यायचे ठरवले होते, तरी मला जर कायद्याचा अभ्यास करणे कंटाळवाणे वाटत असेल, तर मार्केटिंग घेतलेले बरे, हे कळणे!

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# वीज दरवाढ बेकायदेशीर!

## दरवाढ दिशाभूल करणारी; संतप्त ग्राहक संघटनेने वेधले 'या' मुद्यांकडे लक्ष

। मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र राज्य वीज आयोगाने राज्यातील वीज ग्राहकांना दरवाढीचा झटका दिल्यानंतर ग्राहकांनी संताप व्यक्त केला आहे. वीज नियामक आयोगाने केलेली दरवाढ ही अत्यंत बेकायदेशीर मार्गाने आणि चुकीच्या पद्धतीने देण्यात आली असल्याचा आरोप महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचे अध्यक्ष व वीजतज्ज्ञ प्रताप होगाडे यांनी केला आहे. आयोगाच्या या वीज दरवाढीच्या निर्णयाविरोधात विद्युत अपिलय प्राधिकरणाकडे अपील दाखल करून दाद मागण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.**

या दरवाढीचे राज्यातील शेती, उद्योग, व्यापार व घरगुती ग्राहक या सर्वच वर्गावर प्रचंड परिणाम होतील आणि ग्राहकांच्यामध्ये उद्रेकही निर्माण होईल अशी परिस्थिती उद्भवण्याची शक्यता असल्याचा इशारा होगाडे यांनी दिला आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने आज महावितरण कंपनीच्या फेरआढावा आणि दरवाढ याचिकेवरील निर्णय जाहीर केला आहे. या निर्णयानुसार कंपनीला आगामी दोन वर्षात अतिरिक्त महसूल 39567 कोटी रुपये मिळणार आहे. याचा अर्थ वाढीव वसूल केली जाणारी रक्कम म्हणजेच दरवाढ 21.65 टक्के आहे. सरासरी देयक दर जो दाखविण्यात आलेला आहे. पहिल्या वर्षीची वाढ 7.25 टक्के आणि दुसऱ्या वर्षी एकत्रित एकूण वाढ 14.75 टक्के अशी दिसून येत आहे. प्रत्यक्षात वीज आकारातील वाढीची तपासणी केली तर ती वाढ 10 टक्के ते 52 टक्के इतकी असल्याचे प्रताप होगाडे यांनी म्हटले. स्थिर आकारातील वाढीची तपासणी केली तर ती वाढ पहिल्या वर्षी 10 टक्के व दुसऱ्या वर्षी एकूण 20 टक्के याप्रमाणे असल्याचे त्यांनी म्हटले.



महावितरण कंपनीने प्रस्ताव देतेवेळी सध्याच्या दरामध्ये इंधन समायोजन आकाराचा अंतर्भाव केला होता. आयोगानेही मागील आदेशाप्रमाणेच यावेळीही इंधन समायोजन आकार हा सध्याचा दर आहे असे गृहीत धरून दरवाढीचे आकडे कमी दाखवलेले आहेत. प्रत्यक्षात ही सर्वसामान्य वीज ग्राहकांची फसवणूक असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. कोणतीही तुलना ही मागील आदेश आणि नवीन आदेश यामधील फरक या आधारेच झाली पाहिजे. महावितरण कंपनी आणि आयोग दोघेही आपल्या सोयीनुसार शेवटच्या महिन्यातील दर आणि नवीन दर अशी तुलना करतात. ही तुलना करण्याची पद्धत पूर्णपणे चुकीची, बेकायदेशीर आणि ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण करणारी आणि त्यांना फसवणारी अशा स्वरूपाची आहे, असे त्यांनी म्हटले.

आयोगाने मागील आदेशामध्ये शेतीपंपांचा वीज वापर कमी आहे आणि वीज वितरण गळती जास्त आहे हे मान्य केले होते. त्याप्रमाणे शेती पंप वीज वापर कमी करण्यात आला होता. प्रत्यक्षामध्ये याही निकालात गळती 2021-22 या वर्षात 16.57 टक्के नसून 23.54 टक्के आहे असे आयोगाने स्पष्ट केले आहे. प्रत्यक्षामध्ये शेतीपंप वीज वापर कमी गृहीत धरून आदेश दिले असते तर कोणतीही दरवाढ लागणेच शक्य नव्हते. तरीही ही दरवाढ झालेली आहे, याचा स्पष्ट अर्थ पुन्हा एकदा आयोगाने मार्च 2020 च्याच पद्धतीने महावितरण कंपनीला सरकारी कंपनी म्हणून सांभाळले आहे, अपात्री दान दिले आहे आणि कंपनीच्या महागड्या

### महावितरण कंपनीच्या याचिकेवरील निर्णय

**» महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने आज महावितरण कंपनीच्या फेरआढावा आणि दरवाढ याचिकेवरील निर्णय जाहीर केला आहे. या निर्णयानुसार कंपनीला आगामी दोन वर्षात अतिरिक्त महसूल 39567 कोटी रुपये मिळणार आहे. याचा अर्थ वाढीव वसूल केली जाणारी रक्कम म्हणजेच दरवाढ 21.65 टक्के आहे. सरासरी देयक दर जो दाखविण्यात आलेला आहे. पहिल्या वर्षीची वाढ 7.25 टक्के आणि दुसऱ्या वर्षी एकत्रित एकूण वाढ 14.75 टक्के अशी दिसून येत आहे. प्रत्यक्षात वीज आकारातील वाढीची तपासणी केली तर ती वाढ 10 टक्के ते 52 टक्के इतकी असल्याचे प्रताप होगाडे यांनी म्हटले.**

# नारायण राणेंचं मंत्रिपद जाणार? ठाकरे गटाच्या नेत्याचा मोठा दावा

। मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



ठाकरे आणि राणे वाद तसा जुणाच आहे. मात्र राज्यात शिंदे-फडणवीस सरकार स्थापन पासून त्यात अजूनच भर पडली आहे. ठाकरे आणि शिंदे गटातील नेते एकमेकांवर आरोप करत आहेत. अशातच ठाकरे गटाचे आमदार वैभव नाईक यांनी देखील उडी घेतली आहे. त्यांनी शिंदे गट , भाजप आणि राणेंवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

दोन ते तीन महिन्यांमध्ये नारायण राणे यांचं मंत्रीपद जाणार असल्याचं भाकीतच नाईक यांनी वर्तवलं आहे. हे भाकीत नसून वस्तुस्थिती आहे. असं देखील वैभव नाईक म्हणाले आहेत. नारायण राणे यांचं शिवसेनेवर टीका करण्याचं काम होतं. ते काम आता संपलेलं आहे त्यामुळे त्यांचं मंत्रीपद पुढील काही महिन्यांमध्ये जाणार आहे. असा दावा त्यांनी केला.

तर पुढं म्हणाले की, नारायण राणेंना माझ्या विरोधात माझ्या मतदारसंघातून त्यांच्या मुलाला उभं करायचं आहे. मात्र जनतेचा कौल हा उद्धव ठाकरेंसोबत आहे त्यामुळे माझ्याबद्दल संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न ते करत आहेत.तर शिंदेंच्या शिवसेनेतील आमदारांवर बोलताना म्हणाले, जे आमदार आमच्यातून शिंदे गटात गेले आहेत ते आमदार आमच्यात पुन्हा येण्याचा प्रयत्न करत आहेत. उद्धव ठाकरे यांनी आदेश दिला तर अनेक आमदार परत येण्यास तयार आहेत.

# 'मविआ'च्या सभेनिमित्त छत्रपती संभाजीनगर शहरातील चौक झाले भगवेमय!

## सभेच्या निमित्ताने महाविकास आघाडीकडून जोरदार तयारी

। मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

आगामी निवडणुका लक्षात घेता सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले आहे. दरम्यान राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारविरोधात महाविकास आघाडीतील तिन्ही पक्ष आता राज्यभरात एकत्रित सभा घेणार आहे. तर याच सभेची सुरवात छत्रपती संभाजीनगर शहरातून होणार असून, आज 2 एप्रिलला शहरातील मराठवाडा सांस्कृतिक मंडळाच्या मैदानात ही सभा पार पडणार आहे. दरम्यान या सभेच्या निमित्ताने महाविकास आघाडीकडून जोरदार तयारी करण्यात आली असून, शहरभरात



होर्डींग आणि भगवे झेंडे लावण्यात आले आहेत. तर शहरातील सर्व मुख्य चौक भगव्या कपड्यांनी सजवण्यात आले आहेत. त्यामुळे छत्रपती संभाजीनगर शहरातील जवळपास सर्वच चौक झाले भगवेमय झाले आहेत.

आज होणाऱ्या महाविकास आघाडीच्या सभेसाठी गेल्या आठ दिवसांपासून जोरदार तयारी करण्यात येत आहे. तर या सभेची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. सभेकडे जाणारे सर्वच मार्ग भगवेमय झाले आहेत. मुख्य रस्त्यावर सर्वत्र भगवे झेंडे लावण्यात आले आहेत. तसेच बाबा पेट्रोल पंप, वरद गणेश मंडळ चौक, निराला बाजार, सावरकर चौक, टीव्ही सेंटर चौकसह शहरातील सर्वच महत्वाचे चौक भगव्या कपड्यांनी सजवण्यात आले आहेत. तसेच सभेच्या ठिकाणी देखील मोठ्याप्रमाणावर भगवे झेंडे लावण्यात आले आहेत. त्यामुळे सद्या शहरात सर्वत्र भगवेमय वातावरण पाहायला मिळत आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरातील मराठवाडा सांस्कृतिक मंडळावर उद्या महाविकास आघाडीची जाहीर सभा होणार आहे.

### सभेची तयारी अंतिम टप्प्यात...

»आज होणाऱ्या महाविकास आघाडीच्या सभेसाठी तिन्ही पक्षाकडून जोरदार तयार केली आहे. शहरातील मराठवाडा सांस्कृतिक मंडळाच्या मैदानात ही सभा होणार असून, सभेची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. तर सभेसाठी खुर्च्या टाकण्यात आले आहे. तसेच सभेचं स्टेज देखील उभारण्यात आला आहे. तसेच स्टेजवर तिन्ही पक्षाचे झेंडे पाहायला मिळत आहे. तर सभेच्या परिसरात तिन्ही पक्षाकडून आपापल्या पक्षाचे स्वागताचे होर्डिंग देखील लावण्यात आले आहे.

# डोनाल्ड ट्रम्प यांच्या समस्येत वाढ!

## पॉर्न स्टारला गैरमार्गाने पैसे पुरवल्याप्रकरणी चालणार खटला

।न्यूयॉर्क। महाईन्यूज ।

**अध्यक्षीय निवडणुकीपूर्वी बदनामी टाळण्यासाठी एका पॉर्न स्टारला गैरमार्गाने पैसे पुरवल्याप्रकरणी अखेर अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याविरोधात न्यूयॉर्कच्या मॅनहॅटन न्यायालयात खटला चालणार आहे. या न्यायालयाच्या 'न्यायसहायकां'नी (ग्रँड ज्युरी) ट्रम्प यांच्याविरोधात या प्रकरणात पुरेसे पुरावे असल्याचा निर्वाळा गुरुवारी दिला.**



७६ वर्षीय ट्रम्प पुन्हा अध्यक्षीय निवडणुकीच्या रिंगणात उडी घेण्याच्या तयारीत असतानाच, न्यायालयीन कचाट्यात सापडले आहेत. स्टॉर्मी डॅनिएल्स या पॉर्न स्टारसोबत असलेले संबंध उघड होऊ नये यासाठी ट्रम्प यांनी तिच्या मौनाची किंमत म्हणून एक लाख ३० हजार डॉलर अदा केल्याचा आरोप होत आहे. सन २०१६च्या अध्यक्षीय निवडणूक प्रचारादरम्यान झालेल्या या कथित व्यवहाराचा तपास करण्यात आला. या तपासातील तपशील मॅनहॅटन जिल्हा न्यायालयातील न्यायाधीशांच्या मदतीसाठी नियुक्त केलेल्या न्यायसहायकां'समोर (ग्रँड ज्युरी) मांडण्यात आला. अमेरिकन न्यायव्यवस्थेनुसार साधारणपणे २३ जणांच्या या न्यायसहायकांनी ट्रम्प यांच्याविरोधात खटला चालवण्यास पुरेसे पुरावे असल्याचा निर्वाळा दिला आहे. यानंतर ट्रम्प यांना मंगळवारी मॅनहॅटन न्यायालयात उपस्थिती लावावी लागणार आहे. या वेळी त्यांना त्यांच्यावरील आरोप वाचून दाखवण्यात येतील.

न्यूयॉर्क पोलिसांच्या सुट्ट्या रद्द

ट्रम्प यांना मंगळवारी मॅनहॅटन न्यायालयात हजेरी लावावी लागणार असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून न्यूयॉर्क पोलिस दलातील प्रत्येक पोलिस व सहकर्मचाऱ्याने कामावर हजर राहावे, असे आदेश पोलिस दलातर्फे देण्यात आले आहेत. याशिवाय यूएस मार्शल, सिक्रेट सर्व्हिस विभागांनाही विपरीत परिस्थिती हाताळण्यासाठी सज्ज ठेवण्यात आले आहे.

### असे जुळले संबंध

» जुलै, २००६मध्ये एका गोल्फ मदतनिधी स्पर्धेदरम्यान ट्रम्प व पॉर्न स्टार स्टॉर्मी डॅनिएल्स एकमेकांना भेटले. त्यानंतर ट्रम्प यांनी आपल्या अंगरक्षकाकरवी तिला रात्रीच्या जेवणासाठी आमंत्रित केले. त्या वेळी स्टॉर्मी २७ वर्षांची व ट्रम्प ६० वर्षांचे होते. ट्रम्प यांनी तिला आपल्या टीव्ही चॅनेलमधील एका कार्यक्रमात झळकवण्याचा; तसेच क्रीडाविषयक मॅगझिनच्या मुखपृष्ठावर तिचे छायाचित्र प्रसिद्ध करण्याचा शब्द दिला. यानंतर ट्रम्प यांनी आपल्याशी शारीरिक संबंध ठेवले, असा स्टॉर्मीचा आरोप आहे; मात्र ट्रम्प यांनी आपले संबंध केवळ ओळखीपुरतेच मर्यादित आहेत, असा बचाव केला आहे. पुढे अध्यक्षीय निवडणूक प्रचारादरम्यान हा मुद्दा उसळून राजकीय क्षितिजावर येऊ नये, म्हणून ट्रम्प यांनी आपल्या वकिलामार्फत तिला एक लाख ३० हजार डॉलरची रक्कम अदा केल्याचा आरोप आहे.

### 'हा राजकीय अत्याचार'

» ट्रम्प यांनी आपल्यावरील सर्व आरोप फेटाळले आहेत. 'हा अमेरिकेच्या इतिहासातील सर्वांत हीन राजकीय अत्याचार व निवडणूक हस्तक्षेप आहे. राजकीय विरोधकांना नामोहरम करण्यासाठी अमेरिकेच्या भावी अध्यक्षांविरोधात न्याययंत्रणेचा शस्त्र म्हणून वापर करण्याचा डेमोक्रॅटिक पक्षाचा हा प्रयत्न आहे. अध्यक्षीय प्रचाराच्या या वर्षात जो बायडेन यांच्या इशाऱ्यानुसार सरकारी वकील काम करीत आहेत,' असा आरोप ट्रम्प यांनी केला.

# नवज्योतसिंग सिद्धूंची अखेर सुटका!

## दहा महिन्यांनंतर तुरुंगातून आले बाहेर

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**काँग्रेस नेते नवज्योत सिंग सिद्धू यांची पटियाला तुरुंगातून सुटका करण्यात आली आहे. रोड रेज प्रकरणी सिद्धूला एक वर्षाची शिक्षा झाली होती. मात्र शिक्षेचं एक वर्ष पूर्ण होण्याआधी त्यांची सुटका करण्यात आली आहे. सुमारे 48 दिवस अगोदर त्यांची सुटका करण्यात आली आहे. यावेळी कारागृहाबाहेर त्यांच्या समर्थकांची गर्दी दिसून आली. ढोल-ताशांच्या गजरात त्यांचे स्वागत करण्यात आले. नवज्योत सिंग सिद्धू यांची पत्नी नवज्योत कौर यांनी शुक्रवारीच दोन भावनिक पोस्ट टाकल्या. जे खूप व्हायरल होत आहेत.**



1990 च्या रोड रेज प्रकरणी 19 मे 2022 रोजी नवज्योत सिंग सिद्धू यांना न्यायालयाने एक वर्षाची शिक्षा सुनावली होती. त्यानंतर त्यांना पटियाला तुरुंगात ठेवण्यात आले होते. मात्र आज सुमारे ४८ दिवसांपूर्वी त्यांची तुरुंगातून सुटका झाली आहे. तुरुंगाच्या नियमानुसार कैद्यांना दर महिन्याला ४ दिवसांची रजा दिली जाते. मात्र एक वर्षाच्या शिक्षेदरम्यान सिद्धूने एकही दिवस सुट्टी घेतली नाही, त्यामुळे त्यांची लवकर सुटका झाली.

1999 मध्ये ट्रायल कोर्टाने सिद्धूची निर्दोष मुक्तता केली होती, पण पंजाब हरियाणा हायकोर्टाने 2006 मध्ये सिद्धूला तीन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली. सिद्धू तेव्हा अमृतसरमधून भाजपचे खासदार होते. शिक्षेनंतर त्यांनी राजीनामा दिला होता. यानंतर सिद्धूने उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

### काय होते 1988 चे प्रकरण

» हे प्रकरण डिसेंबर 1988 चे आहे. पटियाला येथे कारने जात असताना सिद्धूने ज्येष्ठ नागरिक गुरनाम सिंग यांना धडक दिली होती. तसेच रागाच्या भरात सिद्धूने त्यांना धक्काबुक्कीदेखील केली त्यानंतर गुरनाम सिंह यांचा मृत्यू झाला होता. या सर्व घटनेनंतर पटियाला पोलिसांनी सिद्धू आणि त्याचा मित्र रुपिंदर सिंग यांच्या विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला होता.

# उद्योगपती अदानींच्या अडचणीत वाढ

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।




उद्योगपती गौतमी अदानी यांच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. कारण मार्केट नियामक सेबीने अदानी समूहाच्या परदेशी कंपन्यांसोबत केलेल्या काही व्यवहारांची चौकशी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे नियमांचे संभाव्य उल्लंघनाचा शोध घेतला जाणार आहे. त्यानुसार, आता अदानी समूहाच्या किमान तीन विदेशी कंपन्यांसोबतच्या व्यवहारांची चौकशी करणार आहे. तसेच, अदानी समुहाने केलेल्या 'संबंधित पक्ष व्यवहारां'मध्ये नियमांचे उल्लंघन होत नाही? याची तपासणीही करणार आहे. दरम्यान, या व्यवहारांमध्ये 'रिलेट पार्टी' व्यवहाराच्या नियमांचे उल्लंघन झाल्याचा सेबीला संशय आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उद्योगपती गौतम अदानी यांनी स्थापन केलेल्या पोर्ट-टू-पॉवर समूहाच्या असूचीबद्ध युनिट्ससह गेल्या १३१ वर्षांत तीन संस्थांनी अनेक गुंतवणूक व्यवहार केले आहेत. गौतम अदानींचा भाऊ विनोद अदानी यांचा देखील या संस्थांशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विनोद अदानी एकतर कंपनीचे फायदेशीर मालक, डायरेक्टर किंवा त्यांचा त्यांच्याशी काही संबंध असेल. हे उघड न करणे हे 'संबंधित पक्ष व्यवहार' नियमांचे उल्लंघन आहे का, याची तपासणी सेबी करत आहे.

दरम्यान, अदानी समूहाने अंबुजा सिमेंट आणि एसीसी लिमिटेड हे विनोद अदानी यांच्या कंपन्यांनी विकत घेतले असल्याचे उघड केले होते. याशिवाय विनोद अदानी हे

# 'सर्किट'ला खुणावतंय का टॉलीवूड?

टॉल,डार्क,हॅन्डसम कॅटेगरीत परफेक्ट बसणारा अभिनेता म्हटलं की मराठी इंडस्ट्रीतील वैभव तत्ववादीचं नाव डोळ्यासमोर येतं. त्याचा 'सर्किट' सिनेमा येत्या ७ एप्रिलला आपल्या भेटीस येत आहे. या निमित्तानं त्यानं ईसकाळला दिलेल्या पॉडकास्ट मुलाखतीत मनमोकळा संवाद साधत आपल्या प्रोफेशनल तसंच वैयक्तिक आयुष्यातील अनेक गोष्टींचा खुलासा केला आहे.याच मुलाखतीत त्याला एक प्रश्न विचारला गेला की,'तुला टॉलीवूड खुणावतंय का?', त्यावर वैभवनं तेलुगु इंडस्ट्रीचा उल्लेख करत स्वतःचं एक सीक्रेटही त्यासंदर्भात शेअर केलं आहे. आता वैभव नेमकं काय म्हणाला आहे हे जाणून घेण्यासाठी मात्र आपल्याला बातमीत जोडलेली पॉडकास्टची लिंक क्लिक करावी लागेल.प्रख्यात निर्माता, दिग्दर्शक मधुर भांडारकर निर्मित, प्रस्तुत "सर्किट" या चित्रपटाची चांगलीच हवा झाली आहे. चित्रपटाचा टीजर प्रदर्शित झाल्यापासून अल्पावधीत या टीजरला लाखो व्ह्यूज मिळाले असून, या चित्रपटातील भूमिकेसाठी अभिनेता वैभव तत्त्ववादीनं आपल्या बॉडीबिल्डिंगवर मेहनत घेतल्याचं आलं अन् त्याची जोरदार चर्चा रंगली. याच मुलाखतीत वैभवला जेव्हा विचारलं गेलं की,'तुझ्या आयुष्यात आलेले सर्किट कोण?'



# रश्मिका मंदान्ना आणि विजय देवरकोंडाचा ब्रेकअप?

दाक्षिणात्य अभिनेत्री रश्मिका मंदान्ना नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. दाक्षिणात्य सिनेसृष्टीसह बॉलिवूडमध्येदेखील रश्मिकाने आपल्या अभिनयाची छाप सोडली आहे. रश्मिकाचा मोठा चाहतावर्ग असून सोशल मीडियाच्या माध्यमातून ती चाहत्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करत असते. सिनेमांसह रश्मिका तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळेदेखील चर्चेत असते. रश्मिका दाक्षिणात्य अभिनेता विजय देवरकोंडाला (Vijay Deverakonda) डेट करत असल्याची चर्चा होती. पण आता त्यांचा ब्रेकअप झाल्याचं समोर आलं आहे. तसेच तिचं नाव आता अभिनेता बेलमकोंडा श्रीनिवाससोबत जोडलं जात आहे.

मीडिया रिपोर्टनुसार, रश्मिका मंदान्ना सध्या बेलमकोंडा श्रीनिवासला डेट करत आहे. दोघांना एकत्र स्पॉट करण्यात आले असून दोघांचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. अद्याप दोघांनीही त्यांच्या नात्यासंदर्भात अधिकृत माहिती दिलेली नाही. रश्मिका मंदान्ना आणि विजय देवरकोंडा एकमेकांचे चांगले मित्र आहेत. दोघांनाही अनेकदा एकत्र स्पॉट करण्यात आले आहे. पण आता त्यांचा ब्रेकअप झाल्याचं समोर आलं आहे.

रश्मिकाच्या ‘पुष्पा 2’ची चर्चा!

'पुष्पा: द रूल' या सिनेमात 'पुष्पा: द राईज' प्रमाणेच प्रेक्षकांना ड्रामा, ॲक्शन आणि थ्रील बघायला मिळणार आहे. 'पुष्पा: द रूल' हा सिनेमा जगभरातील सिनेप्रेक्षकांच्या पसंतीस उतरला होता. या सिनेमातील डायलॉग, कथानक आणि चित्रपटातील गाण्यांना प्रेक्षकांची विशेष पसंती मिळाली होती. या सिनेमाने 300 कोटींहून अधिक कमाई केली होती. त्यामुळे 'पुष्पा 2' किती कोटींचा गल्ला जमवणार याकडे प्रेक्षकांचं लक्ष लागलं आहे.

मीडिया रिपोर्टनुसार, 'पुष्पा: द रूल' हा चित्रपट 2023 मध्ये प्रदर्शित होणार आहे. या सिनेमात अल्लू अर्जुन, फहाद फाजिल आणि रश्मिका मंदना हे पहिल्या भागातील कलाकार दिसणार आहेत. तसेच, 'पुष्पा 2'मध्ये विजय सेतुपती महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार असल्याचे म्हटले जात आहे.

वयाच्या 17 व्या वर्षी रश्मिकाने आपल्या फिल्मी करिअरला सुरुवात केली. रश्मिकाने दाक्षिणात्य सिनेसृष्टीसह बॉलिवूडमध्येदेखील आपल्या अभिनयाची छाप सोडली आहे. इन्स्टाग्रामवर रश्मिकाचे 29 मिलियन फॉलोअर्स आहेत. रश्मिकाचे बोलके डोळे आणि तिच्या स्मित हास्याने तिने अनेकांना घायाळ केले आहे.



# 59 वर्षीही इतकी उर्जा!

नीता मुकेश अंबानी कल्चरल सेंटरचा उद्घाटन सोहळा सध्या चर्चेत आहे. अंबानी कुटुंबाच्या एंट्रीने चाहत्यांची मने जिंकली, तर बॉलिवूड ते हॉलिवूड स्टार्सच्या सहभागाने चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले.

पण आता या कार्यक्रमाचा एक आतला व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये नीता अंबानी 'द ग्रेट इंडियन म्युझिकल: सिव्हिलायझेशन टू नेशन'मध्ये खास परफॉर्मन्स देताना दिसत आहेत.

हे परफॉर्मेंस सोशल मीडियावर चाहत्यांची मने जिंकत आहे.पापाराझींनी शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये नीता अंबानी लाल आणि गुलाबी रंगाच्या सुंदर लेहेंगामध्ये परफॉर्म करताना दिसत आहेत. यामध्ये श्रेया घोषालने गायलेले रघु पती राघव राजा राम या गाण्यावर नीता अंबानी यांचे सुंदर नृत्य चाहत्यांची मने जिंकत आहे. अंबानी कुटुंबाच्या या खास कार्यक्रमात शाहरुख खान, सलमान खान, दीपिका पदुकोण, रणवीर सिंग, प्रियांका चोप्रा, निक जोनास आणि अनेक बॉलिवूड आणि हॉलिवूड स्टार्स दिसले. या व्यतिरिक्त संपूर्ण अंबानी कुटुंब या खास प्रसंगी एकत्र दिसले, ज्यांचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.



# आधी स्वराज्य मग आपला संसार... ओम भूतकरच्या 'रावरंभा'चा अंगावर शहारे आणणारा टीझर आऊट



गेल्या काही दिवसांत अनेक ऐतिहासिक सिनेमे प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. बॉक्स ऑफिसवर जादू दाखवण्यात हे सिनेमे यशस्वी ठरत आहेत. लवकरच 'रावरंभा' हा ऐतिहासिक सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकताच या सिनेमाचा टीझर आऊट झाला आहे. आणणारा आहे. 'आधी स्वराज्य मग आपला संसार', 'मावळ्याचं पहिलं लग्न तलवारीशी', असे दमदार डायलॉग या सिनेमात आहेत. या सिनेमाच्या माध्यमातून इतिहासाच्या पानांमध्ये दडलेली एक अनोखी प्रेमकथा प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे.

'मुळशी पॅटर्न'च्या माध्यमातून आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकणारा ओम भूतकर आणि सौंदर्यासोबत आपल्या अभिनयाने प्रेक्षकांवर छाप सोडणारी मोनालिसा बागल या सिनेमाच्या माध्यमातून रुपेरी पडद्यावर झळकणार आहे.

'रावरंभा' कधी येणार प्रेक्षकांच्या भेटीला? 'रावरंभा' हा सिनेमा येत्या 12 मे रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे. अनुप जगदाळे यांनी या सिनेमाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळली आहे. या सिनेमात छत्रपतींच्या भूमिकेत शंतनू मोघे तर प्रतापराव गुजर यांच्या भूमिकेत अशोक समर्थ दिसणार आहे. या सिनेमातील गाणी गुरु ठाकूर आणि क्षितीज पटवर्धनने लिहली आहेत.

# जायंट्सचा 50 धावांनी दणदणीत विजय

## मार्क वूडचे पंचक! लखनऊच्या नवाबांसमोर दिल्ली कॅपिटल्स ढेर

। लखनऊ ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**इंडियन प्रीमिअर लीग २०२३मध्ये शनिवारी (१ एप्रिल) दिवसातील दुसरा सामना दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध लखनऊ सुपरजायंट्स यांच्या दरम्यान खेळला गेला. लखनऊ येथील इकाना स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात दोन्ही संघ विजयी सलामी देण्याच्या इराद्याने मैदानात उतरले होते मात्र जायंट्सने 'आप लखनऊ मे है' असं म्हणत दिल्ली कॅपिटल्सला ५० धावांनी धूळ चारली. आपला नियमित कर्णधार ऋषभ पंत याच्या अनुपस्थितीत खेळत असलेल्या दिल्लीने या सामन्यावेळी त्याची आठवण काढली. हा सामना जिंकून त्याला भेट देण्याचा विचार मात्र फोल ठरला.**

धावांचा पाठलाग करताना दिल्लीची सुरुवात चांगली झाली होती. मात्र, अचानक लखनऊच्या ताफ्यातील मार्क वूड नावाचे वादळ घोंगावत आले आणि त्याने दिल्ली कॅपिटल्सला नेस्तनाबूत करत ५० धावांनी दणदणीत विजय मिळवला. लखनऊच्या अटल बिहारी वाजपेयी एकना स्टेडियमवर एलएसजीने १९४ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात दिल्लीचा संघ २० षटकांत ९ गडी गमावून १४३ धावाच करू शकला. डीसीकडून कर्णधार डेव्हिड वॉर्नरने सर्वाधिक धावा केल्या. त्याने ४८ चेंडूत ७ चौकारांसह ५६ धावांची खेळी केली. त्या व्यतिरिक्त रिले रुसो ३० (२०), अक्षर पटेल १६ (११) आणि पृथ्वी शॉ १२ (९) यांनाच केवळ दोनआकडी संख्या गाठता आली. आवेश खान आणि रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी दोन बळी घेत मार्क वूडला साथ दिली.तत्पूर्वी, आयपीएल २०२३ स्पर्धेत काही नवीन नियम लागू करण्यात आले आहेत. यापैकीच एक नियम म्हणजे



इम्पॅक्ट प्लेयर हा होय. हा नियम सध्या सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहे. मात्र, या नियमाचा फायदा पहिल्या दोन सामन्यात फारसा झाला नाही. मात्र, लखनऊ सुपर जायंट्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स संघातील तिसऱ्या सामन्यात या नियमाचा चांगलाच फायदा झाला. लखनऊच्या डावातील अखेरच्या चेंडूवर इम्पॅक्ट प्लेअरच्या रूपात कृष्णप्पा गौथम फलंदाजीला आला. त्याने खेळपट्टीवर येताच षटकार ठोकत आपल्या संघाची धावसंख्या १९३ करून टाकली. गौथमने एकाच चेंडूचा पुरेपूर फायदा उचलला.

दिल्ली कॅपिटल्सने ऋषभ पंतची जर्सी डग आऊटवर टांगली होती आणि त्यांच्या या कृतीने सर्वांची मनं जिंकली. दिल्लीच्या चेतन सकारियाने चौथ्या षटकात लखनऊचा कर्णधार लोकेश राहुल (८) याला बाद केले. कायले मायर्सचा सोपा झेल खलिल अहमदने टाकला अन् तोच महागात पडला. त्याने २९ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. दीपक हुडा व मायर्स यांनी दुसऱ्या विकेटसाठी ४२ चेंडूंत ७९ धावांची भागीदारी केली. यापैकी ६२ धावा (२४ चेंडू) या मायर्सने चोपल्या होत्या. कुलदीप यादवच्या गुगलीवर हुडा (१७) झेलबाद झाला.

लखनऊने कृणाल पांड्याला प्रमोशन देताना चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला पाठवले. मायर्स आज वादळ आणतोय असे दिसत असताना अक्षर पटेलने अप्रतिम चेंडू टाकला. मायर्स ३८ चेंडूत २ चौकार व ७ षटकारांसह ७३ धावांवर त्रिफळाचीत झाला. डोकेदुखी ठरणाऱ्या मार्कस स्टॉयनिसला (१२) खलिलने बाद करून दिल्लीला मोठं यश मिळवून दिले. एक कॅरेबियन खेळाडू बाद झाल्यानंतर निकोलस पूरन दिल्लीचं टेंशन वाढवताना दिसला. पूरनने २१ चेंडूंत २ चौकार व ३ षटकारांसह ३६ धावा केल्या. खलिलच्या गोलंदाजीवर पृथ्वी शॉने चांगला झेल टिपला. खलिलने ३० धावांत दोन विकेट्स घेतल्या. त्यानंतर आलेल्या आयुष बदोनीने ७ चेंडूंत १८ चेंडू कुटल्या, चेतनने त्याची विकेट घेतली.

# पंजाब किंग्जच्या फलंदाजांचा धमाका

## राजपक्षेचं वादळी अर्धशतक, कोलकाताला 192 धावांचं आव्हान

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएलच्या १६ व्या हंगामाचा दुसरा सामना आज मोहालीत ब्रिंद्रा स्टेडियमवर पंजाब किंग्ज आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात होत आहे. कोलकाता नाईट रायडर्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. नीतीश राणाच्या नेतृत्वात कोलकाताचा संघ पंजाब किंग्जशी भिडण्यासाठी मैदानात उतरला आहे.**

दरम्यान, मैदानात फलंदाजीसाठी मैदानात उतरलेल्या पंजाब किंग्जच्या फलंदाजांनी कोलकाता नाईट रायडर्सच्या गोलंदाजांचा समाचार घेतला. भानुका राजपक्षेनं वादळी अर्धशतक ठोकलं. तर कर्णधार शिखर धवनने ४० धावांची खेळी साकारली. त्यामुळे पंजाबने २० षटकांत ५ विकेट्स गमावत १९१ धावा केल्या. कोलकाता नाईट रायडर्सला विजयासाठी १९२ धावांचं लक्ष्य गाठावं लागणार आहे.

पंजाब किंग्जसाठी सलामीला मैदानात उतरलेल्या प्रभसिमरन सिंगने सुरुवातीच्या षटकांमध्ये चौफेर फटकेबाजी केली. सिंगने दोन चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने १२ चेंडूत २३ धावांची खेळी केली. परंतु, टीम साऊदीने सिंगला २३ धावांवर असताना झेलबाद केलं आणि



पंजाबला पहिला धक्का दिला. पण त्यानंतर भानुका राजपक्षेने आक्रमक खेळी करत पॉवर प्ले मध्ये पंजाबला ५० धावांपर्यंत पोहोचवलं. त्यानंतरही भानुकाने मोठे फटके मारत ३२ चेंडूत ५० धावांची अर्धशतकी खेळी केली.

मात्र, उमेश यादवच्या गोलंदाजीवर राजपक्षे ५० धावांवर झेलबाद झाला. त्यानंतर शिखर धवन आणि जितेश शर्माने पंजाबची कमान सांभाळली.मात्र, जितेश शर्माला पंजाब किंग्जसाठी मोठी खेळी करता आली नाही.

# मोहम्मद शमीने रचला नवा विक्रम!

### कॉनवेला बाद करत ब्राव्हो-मलिंगाच्या क्लबमध्ये सामील

। चेन्नई । महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।

आयपीएल २०२३चा पहिला सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि गुजरात टायटन्स यांच्यात खेळला गेला. गुजरातचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी या सामन्यात उत्कृष्ट लयीत होता. त्याने चार षटकांत २९ धावा देत दोन बळी घेतले. यासह त्याने ड्वेन ब्राव्हो आणि लसिथ मलिंगासारख्या अनुभवी गोलंदाजांच्या खास क्लबमध्ये स्थान मिळवले. शमी आयपीएलमध्ये १०० बळी घेणाऱ्या गोलंदाजांच्या क्लबमध्ये सामील झाला आहे. अशी कामगिरी करणारा तो १८वा आणि १४वा भारतीय गोलंदाज आहे.

शमीने ९४ आयपीएल सामन्यात १०१ विकेट घेतल्या आहेत. यादरम्यान त्याची सर्वोत्तम कामगिरी म्हणजे १५



धावांत तीन बळी. आयपीएलमध्ये, त्याने प्रत्येक २१व्या चेंडूवर एक विकेट घेतली आहे आणि ८.५० च्या इकॉनॉमी रेटने धावा दिल्या आहेत. या लीगमध्ये तो एक विकेट घेण्यासाठी सरासरी २९ धावा खर्च करतो.

वास्तविक, मायकेल वॉनने १५ ऑक्टोबर २०१० रोजी केलेल्या ट्विटमध्ये लिहिले होते की, 'लंडनमध्ये फारसे इंग्लिश लोक राहत नाहीत, मला नवीन भाषा शिकण्याची गरज आहे.' या ट्विटसाठी वॉनची निंदा करण्यात आली होती, ज्याचा संबंध वण्द्विषाशी जोडला जात होता.